Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# अध्ययन अक्षमता

**डॉ. कल्पना रामराव विटोरे**
सहाय्यक प्राध्यापक,
कला महाविद्यालय ,तीर्थपुरी
ता.घनसावंगी जि.जालना

**सारांश :-**

21व्या शतकात मानसिक आरोग्य राखणे ही काळाची गरज आहे .मानसिक आरोग्यस सकारात्मक विचार, कल्पना आणि अभिवृत्ती हे आकार देतात. समाजातील प्रत्येक व्यक्तीचे शारीरिक, मानसिक, सामाजिक आणि भावनिक आरोग्य हे त्यांच्या विचारावर अवलंबून असते. आजच्या काळात प्रत्येक क्षेत्रात कार्य करण्याच्या ठिकाणी सकारात्मक मानसिक आरोग्याची गरज निर्माण झाली आहे.

मानसिक आरोग्याचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे मानसिक आरोग्याची जोपासना करणे, संवर्धन करणे , सुधारणा घडवून आणणे, व्यक्तीमत्व विकासाच्या दृष्टीने सर्वांगीण विकास करून जीवन सुखी व समृद्ध करण्याचा प्रयत्न केला जातो असामान्य मूल सामान्य मुलांपेक्षा शारीरिक विकास, मानसिक क्षमता, सामाजिक वर्तन आणि भावनिक समायोजन इत्यादी बाबतीत मागे किंवा पुढे असते. असामान्य बालकाला योग्य दिशा, योग्य पद्धती , योग्य साहित्य, योग्य वातावरण आणि चैतन्य यांचे शिकवण्याची गरज असते. असामान्य बालकाच्या समस्येत अध्ययनअसामान्य बालकाच्या समस्येत अध्ययन क्षमता ही एक समस्या आहे. या समस्येच्या संदर्भात सकारात्मक विचार करणे गरजेचे आहे .त्यांच्या वेगळेपणाची दखल घेण्याची गरज असून त्यांच्यासाठी विशेष शिक्षणाची व्यवस्था व्यक्ती वेदा नुसार व अपंगत्व आणि त्याचे प्रमाण यानुसार केलेली असते. विशेष गरजा असणाऱ्या बालकांची मूल्यमापन योग्य पद्धतीने होईल, आवश्यक क्षमता त्यांच्यात निर्माण होतील तसेच यशस्वीपणे ते आपल्या भविष्याचा सामना करू शकतील

**प्रस्तावना:-**

आपल्या समाजात लोकशाही तत्वांनुसार सर्व मुलांना शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे मग तो हु शार असेल असेल सरासरी असेल अथवा आंधळा मुका मतिमंद असेल व्यक्ती भेद मानसशास्त्राच्या विकासानंतर व्यक्तीभेदानुसार नुसार विशेष शिक्षणाची गरज आहे. .सर्व सामान्य बालकांची व्याख्या निरनिराळ्या मानसशास्त्रज्ञांनी असामान्य बालकांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे सांगितले आहेत. किर्क (Kirk) 1962 यांच्या मते, "जे बालक सामान्य बालका पेक्षा शारीरिक, मानसिक आणि सामाजिक बाबतीत वेगळी असते आणि ज्याला अधिकतम क्षमता विकासासाठी शालेय स्तरावरील सराव आणि विशेष शैक्षणिक सेवांची आवश्यकता असते त्याला असामान्य बालक असे म्हणावे.

कुईकँशक(Cruickshank) यांच्या मते," जे बालक बौद्धिक, शारीरिक ,सामाजिक आणि भावनिकदृष्ट्या सामान्य वाढ आणि विकासापेक्षा खूपच अलग असते. त्याला नियमित शाळा कार्यक्रमातून अधिक फायदा मिळालेला नसतो आणि ज्याला विशेष वर्गाची आवश्यकता आवश्यकता असते त्याला असामान्य बालक असे म्हणतात." असामान्य बालकांच्या काही समस्या सामान्य बालकाप्रमाणे असतात किंवा त्यांच्यापेक्षा वेगळे असतात.

असामान्य बालकांचे प्रकार व सामान्य बालकांची अनेक प्रकार आहेत

1)दृष्टीदोष असणारी बालके

(a) आंधळे

(b) अल्पदृष्टी

2) श्रवण दोष असणारी बालके (a)बहिरे

(b) कमी ऐकू येणारे

3) अध्ययन क्षमता असणारी बालके

(a) अक्षमता

(b) लेखन अक्षमता

(c) आकलन -संप्रेषण अकार्यक्षमता

(d) अंकगणितीय क्षमता दोष

(e) मतिमंद बालके

(f) प्रज्ञावंत बालके

(g) भावनिक दृष्ट्या विचलित असणारी बालके

(h) वाचा दोष असणारी बालके

(i) सामाजिक दृष्ट्या दुर्बल असणारी बालके

(j) बालगुन्हेगार

(k) सर्जनशील बुद्धिमत्ता असणारी बालके

(l) अस्थिव्यंग बालके

या प्रकारांपैकी अध्ययन अक्षमता हि एक महत्त्वपूर्ण समस्या आहे.

**अध्ययन अक्षमता असणारी बालके :-**

विशिष्ट विषयाच्या अध्ययनात समस्या असणाऱ्या बालकांची संख्या मोठी आहे. सामान्य मुलांच्या तुलनेत समान वयाच्या मुलांइतकी अध्ययन क्षमता ज्या मुलात असत नाही तसेच सामान्य मुलांइतके ज्यांना आकलन होत नाही त्या मुलांचा समावेश अध्ययन अक्षमता गटात होती. अध्ययन अकार्यक्षम मुले शारिरीक दृष्ट्या चांगली असुन त्यांच्यात दृष्टिदोष ,श्रवण दोष असत नाही."अध्ययन क्षमतेचा संबंध अध्ययन समस्येशी आहे ज्यांना सोबत लेखन,वाचन, बोलणे ,विचार, श्रवण आणि आकडेमोड इत्यादी जमत नाही त्यांना आपण अध्ययन अकार्यक्षम म्हणतो."

अध्ययन अकार्यक्षमता ही मानसिक प्रक्रियेतील दोष किंवा मेंदूमधील बिघाड यामुळे उद्भवते.

Cosmos Multidisciplinary Research E-Journal Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal Impact Factor 4.94 ISSN No. 2456-1665

किर्क (Kirk) यांच्या मते, "अध्ययन अक्षमता ही संकल्पना केवळ अध्ययनात तात्पुरती अडचण असणाऱ्या मुलांसाठी वापरली जात नाही तर शैक्षणिक कार्यातील संपादनुक आणि क्षमता या दोन्ही मधील गंभीर विसंगती यासाठी वापरली जाते. अध्ययनातील ही क्षमता मतिमंदत्व, संवेदन दोष ,भावनिक विचलन किंवा अध्ययनासाठी च्या
अपुऱ्या संधी इ.येत नाही."

**अध्ययन क्षमता असणाऱ्या बालकांची ओळख :-**

बालक आणि बालकांचे पालक यांची मुलाखत निरीक्षण आणि मूल्यमापनाच्या मापनाच्या कसोट्या वापरून अध्ययन अकार्यक्षम बालके ओळखता येतात. ही बालके ओळखण्यासाठी एनसीईआरटी(NCERT) नवी दिल्ली ने पडताळा सूची पुढील प्रमाणे सांगितली आहे.

(1) अध्ययन अक्षमता असणाऱ्या बालकास वेळ ,वार ,महिने, ऋतू आणि गणितीय तालिका सांगण्यात अडचणी येतात.

(2) तोंडी सांगितलेल्या सूचना लक्षात राहत नाही व सांगताही येत नाही.

(3) डावे व उजवे यात नेहमी गोंधळ उडतो .

(4) इतरांना कमी गतीने प्रतिक्रिया देतात .

(5) शब्द विग्रह करून वाचतात.

(6) अक्षरांची रचना चुकीच्या पद्धतीने करतात.

(7) शब्दाची लांबी कमी करतात.

(8) अक्षरांना उलट वाजतात किंवा त्यांची रचना चुकीच्या पद्धतीने करतात.

(9) इंग्रजीतील शब्द अत्यंत मागासलेपण वाचतात.

वरील सुचीच्या साह्याने अध्ययन क्षमता बालकांची ओळख पटल्यास तज्ञांकडून त्या बालकांचे मूल्यमापन होते.

**अध्ययन अक्षमता असणाऱ्या बालकांची वैशिष्ट्य:-**

(1)अध्ययन अक्षमता असणाऱ्या बालकांचा क्षमता स्तर सरासरीएवढा असतो.

(2)एखाद्या कार्यावर अधिक काळ अवधान केंद्रित करू शकत नाही.

(3) प्रत्येक कार्य मंद गतीने करणारा तसे आळशी आणि सतत कारक कार्यात गुंतलेला असतो

(4) या बालकात शैक्षणिक अक्षमता जाणवतात. त्यात लेखन, वाचन ,आकडेमोड, स्पेलिंग, नकाशा वाचन इ. जमत नाही.

(5) या बालकांमध्ये भाषिक, समायोजनत्मक आणि अवबोधात्मक समस्या आढळतात .

**अध्ययन अक्षमतेचे प्रकार:-**

अध्ययन क्षमता अनेक प्रकारांची असू शकते. उदाहरणार्थ लेखन, वाचन ,आकलन आणि अंकगणितीय इत्यादी

**(a) वाचन अक्षमता**

वाचना संबंधी दोन प्रकारचे अध्ययन अक्षमता असते. आवाज अक्षरे आणि शब्द यांच्यातील संबंध समजण्यात अडचण येतात तेव्हा मूलभूत वाचन समस्या उद्भवतात. जेव्हा शब्द ,वाक्ये

आणि आणि परिच्छेदाचा अर्थ समजण्यास असमर्थता असते. तेव्हा वाचन आकलनाची समस्या उद्भवते. अक्षर आणि शब्द ओळख, शब्द आणि कल्पना समजून घेणे, वाचन वेग आणि ओघ. सामान्य शब्दसंग्रह कौशल्य या वाचन समस्या जाणवतात. वाचन अक्षमता असणाऱ्या बालकांना वाचन जमत नाही.

(1) सौम्य,:- सौम्य वाचन क्षमता असणारी बालके नियमित शाळांमध्ये शिकू शकतात.

(2) गंभीर वाचन अक्षमता:- गंभीर किंवा तीव्र वाचन क्षमता असणाऱ्या बालकांना कसलेच वाचन जमत नाही. त्यासाठी त्यांना विशेष शिक्षणाची गरज असते. वाचन दोष सुरुवातीला लक्षात आल्यास त्यावर उपाययोजना करून त्यांचे समायोजन साधणे शक्य होते.

**(B) लेखन अक्षमता**:- लेखन अक्षमता असणारी बालके स्वयंस्फूर्तपणे लिहू शकत नाही लेखनातील अध्ययन अक्षमता यात प्रत्यक्ष लिखाण किंवा माहितीचे आकलन आणि संश्लेषण करण्याची मानसिक क्रिया समाविष्ट असु शकते. मुलभूत लेखन विकार हे शब्द आणि अक्षरे तयार करण्यात येणारी शारीरिक अडचण होय. भावपूर्ण लेखन अक्षमता कागदावर विचार प्रकट करण्याचा संघर्ष दर्शवतात. लिखित भाषा शिकण्याची अक्षमता ही लक्षणे लेखनाच्या कृतीत अडचणी निर्माण करतात. या अकाक्षमतेचेही दोन प्रकार पडतात .

(1) सौम्य लेखन अक्षमता:- सौम्य लेखन अक्षमता असणारी बालके सहज वाचता येण्यासारखे लिहू शकतात. ही बालके नियमित शाळांमध्ये शिकु शकतात. हा दोष लक्षात आल्यावर त्यावर उपाययोजना करून समायोजन साधता येते.

(2) गंभीर लेखन अक्षमता:- गंभीर अथवा तीव्र लेखन अक्षमता असणारी बालके पाहून लिहू शकतात .मात्र स्वयंस्फूर्तपणे लिहू शकत नाही. ही बालके सहज ओळखता येतात .अशा बालकांना उपचार सरावाची गरज असते .

**(C) आकलन संप्रेषण अक्षमता:-** ही अक्षमता असणाऱ्या बालकांना लेखन, वाचन ,भाषण यातून संप्रेषण करण्यात समस्या निर्माण होतात. ज्या बालकात सौम्य आणि तीव्र स्वरूपात आकलन-संप्रेषण क्षमता असते त्यांना बोललेले, लिहिलेले तसेच सांकेतिक खुणा आणि हावभावही समजत नाही. भाषा आणि संप्रेषण अध्ययन अक्षमतेमध्ये बोललेली भाषा समजण्यास किंवा बोलण्यात अडचणी असू शकतात. भाषेला आउटपुट क्रिया देखील मानले जाते. कारण त्यासाठी मेंदूमध्ये विचारांचे आयोजन करणे आवश्यक आहे.

(1) सौम्य आकलन संप्रेषण अक्षमता :- सौम्य स्वरूपातील मुलांचे उपायोजना अंती समायोजन साधता येते .

(2)गंभीर आकलन- संप्रेषण अक्षमता:- गंभीर स्वरूपात ही कार्यक्षमता असेल तर समायोजन साधता येत नाही. त्यांना तीव्र उपचार सरावाची आवश्यकता असते .

**(D) अंकगणितीय क्षमता दोष**:- ही क्षमता असणाऱ्या बालकांना गणितीय किंवा इतर आकडेमोड जमत नाही. या समस्या आकडयांआकडयांतील परस्पर संबंध ओळखता न आल्याने जाणवतात. मुलांच्या इतर सामर्थ्यनुसार आणि तार्किक क्षमतेवर अवलंबून गणितातील अध्ययन अक्षमता

मोठ्या प्रमाणात आढळते. एखाद्या मुलाची गणित करण्याची क्षमता, भाषा शिकण्याच्या अक्षमतेमुळे किंवा दृश्य विकारामुळे, स्मृती किंवा मज्जासंस्थेच्या अडचणीमुळे भिन्न प्रकारे प्रभावित होऊ शकते.

(1) सौम्य अंकगणितीय क्षमता दोष:- ही बालके नियमित वर्गात शिकू शकतात प्राथमिक स्तरावर दोष ओळखता येत नसला तरी आकडे आणि संख्या अध्ययनास सुरुवात झाल्यास हा दोष ओळखता येतो. हा दोष ओळखता आल्यास योग्य उपाययोजना करून समायोजन साधता येते.

(2) गंभीर अंकगणितीय क्षमता दोष:- ही समस्या असणाऱ्यांना विशेष शैक्षणिक सरावाची आवश्यकता असते.

अध्ययन अक्षमता असलेल्या मुलांना वाचन, लेखन ,बोलणे, ऐकणे ,गणितीय संकल्पना समजून घेण्यात आणि सामान्य आकलनात अडचणी येऊ शकतात.

" विशिष्ट अध्ययन अक्षमता म्हणजे लिखाण, बोलणे किंवा भाषा समजून घेण्यात किंवा ऐकणे बोलणे, वाचणे, शब्द लेखन करणे किंवा गणिते करण्याची क्षमता प्रकट करताना मूलभूत मानसशास्त्रीय प्रक्रियेत एक किंवा अधिक विचार अंतर्भूत असतात."

अध्ययन अक्षमतेचे कोणतेही एकच विशिष्ट कारण नाही, तथापि अशी काही कारणे आहेत ज्यामुळे अध्ययन अक्षमता येऊ शकते.

(1) अनुवंशिकता असे लक्षात आले आहे की, ज्यांच्या पालकांमध्ये अध्ययन अक्षमता आहे तेच विकार त्या मुलास होण्याची शक्यता अधिक आहे.

(2) बालपणातील तणाव तीव्र ताप, डोक्यास दुखापत किंवा अपूर्ण पोषण आहार यासारख्या जन्मानंतरच्या तणावपूर्ण घटनांमुळे अध्ययन क्षमता येऊ शकते.

(3) जन्मादरम्यान किंवा नंतर आजार किंवा दुखापत झाल्यास अध्ययन अक्षमता येऊ शकते.

**अध्ययन क्षमतेतील चिन्हे** :- सामान्य शारिरीक विकास, मुलास मूलभूत जाणीव आणि कारक कौशल्याचा एक विशिष्ट संच मिळण्याची अपेक्षा असते. या विकासातील कोणताही विलंब किंवा अंतर अध्ययन क्षमतेचे लक्षण असू शकते. परिस्थितीचे निदान करण्यापूर्वी चांगल्या- संशोधित आणि प्रमाणित चाचण्या आणि मूल्यांकनाची मालिका करून घ्यावी लागते. बालपणातील प्रत्येक टप्प्यात अध्ययन अक्षमतेचे चिन्ह थोडी वेगवेगळी असू शकतात. विशिष्ट वयात विशिष्ट गोष्टी येणे अपेक्षित असते. अध्ययन अक्षमतेचे निदान शिक्षक, बालरोगतज्ज्ञ, बालमानसतज्ज्ञ , बालविकासतज्ज्ञ यांच्या एकत्रित प्रयत्नांमधून होऊ शकते. जेवढया लवकर निदान होईल, तेवढया लवकर रेमेडियल शिक्षकांच्या मदतीने त्या मुलासाठी व्यक्तीगत शैक्षणिक विकास कार्यक्रम आखून त्या मुलांच्या कलाने, वेगवेगळ्या शिक्षणपध्दती वापरुन निरंतर टप्प्याटप्प्याने शिक्षण देता येते. यात शाळेतील शिक्षकांचा सकारात्मक पाठिंबा व पालकांचा संयम व सक्रिय सहभाग महत्त्वाचा ठरतो.

**अध्ययन अक्षमता कार्यक्रम बालकांची काळजी आणि प्रशिक्षण**:-

अध्ययन क्षमता असणारी बालके त्यांच्या शाळेतील किंवा वर्गातील इतर मुलांपेक्षा वेगळी असतात. त्यांच्या अक्षमतेचे प्रमाण गंभीर असेल तर त्यांना विशेष वर्गाची गरज असते. जिथे विशेष शिक्षक, विशेष पद्धतीने व तंत्राच्या साहयाने तोच अभ्यासक्रम विशेष लक्ष देऊन पूर्ण करून घेतात. या बालकांच्या इच्छित व्यक्तिमत्वगुण संपादणूकीसाठी पालक, शिक्षक यांचे विशेष प्रयत्न असावीत. अध्ययन क्षमता असणाऱ्या बालकांना चांगले समजून घेऊन त्यांची मने जिंकावी. त्यांना मदत करावी आपले अनुभव, त्यांना सांगून दुसऱ्याच्या अनुभवातून शिकण्यास सांगितले. तसेच त्यांच्यासाठी अध्यापनात शैक्षणिक साहित्याचा वापर करून संकल्पना अधिक चांगल्या प्रकारे स्पष्ट करण्याचा प्रयत्न करावा. अशा विद्यार्थ्यांना शिकवलेले समजत नसेल तर त्यांना काळजीपूर्वक समजून सांगावे अशाप्रकारे अध्ययन अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना हाताळल्यास आवश्यक त्या क्षमता त्यांच्यात निर्माण होऊन सहजपणे ती मुले/किशोर भविष्याचा सामना करतील. त्यातूनच त्यांचा आत्मविश्वास वाढून व्यक्तिमत्व विकसित झालेले दिसून येते.

**संदर्भग्रंथ**:-

(1) प्रा. कुमार के. एस. “शैक्षणिक मानसशास्त्र” (प्रथम आवृत्ती- 2009) विद्या प्रकाशन, नागपूर
(2) कुलकर्णी के.वी. “शैक्षणिक मानसशास्त्र” (प्रथमावृत्ती-1977) श्री विद्या प्रकाशन, पुणे.
शेवतेकर-बडवे शारदा “विकासाचे व अध्ययनाचे मानसशास्त्र, (प्रथम आवृत्ती-2004) विद्या प्रकाशन, नागपूर